अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 08 ऑक्टोबर 2026 | वर्ष 12 वे | अंक 09 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## बारई तलावाची 'घरपड' नव्हे 'तलाव' अशी नोंद करा

### नियोजन सभापती सचिन राऊत यांची मागणी; आंदोलनाचा इशारा

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रह्मपुरी नगरपालिका क्षेत्रातील गट क्रमांक ५२२ च्या सातबारा उताऱ्यावर असलेली 'घरपड' नोंद दुरुस्त करून त्या ठिकाणी 'तलाव' अशी नोंद करण्यात यावी, तसेच प्रत्यक्ष स्थळाची मोका पाहणी करून पंचनामा करावा, अशी मागणी नगरसेवक तथा नियोजन सभापती सचिन केवळराम राऊत यांनी तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

गट क्रमांक ५२२ वर ब्रह्मपुरी शहराच्या विकास आराखड्यात 'Tank and Beautification of Tank' असे आरक्षण कायम असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, सध्या दुष्काळसदृश परिस्थिती असतानाही या ठिकाणी मोठ्या प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध असून, हा शहरातील महत्त्वाचा जलस्रोत असल्याचा दावा राऊत यांनी केला आहे. मात्र, संबंधित जमिनीच्या सातबारा उताऱ्यावर 'घरपड' अशी नोंद असल्याने ती




दुरुस्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.

याच विषयासंदर्भात २ सप्टेंबर २०२६ रोजी तहसील कार्यालयाकडे निवेदन देण्यात आले होते. मात्र, महिन्यापेक्षा अधिक कालावधी उलटूनही ठोस कार्यवाही झालेली नसल्याचे राऊत यांनी निवेदनात म्हटले आहे. नगरपरिषदेच्या नवीन विकास आराखड्याचे काम प्रक्रियेत असल्याने या प्रकरणाची तातडीने पडताळणी करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संबंधित तलाठी, मंडळ अधिकारी आणि नगररचना विभागाच्या अभियंत्यांच्या उपस्थितीत संयुक्त स्थळ पाहणी करून महसूल अभिलेख व विकास आराखड्यातील आरक्षणाची पडताळणी करावी आणि सातबारा उताऱ्यावर 'तलाव' अशी योग्य नोंद करण्याची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रशासनाने सात दिवसांत कार्यवाही न केल्यास लोकप्रतिनिधी व नागरिकांना सोबत घेऊन तहसील कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने आंदोलन अथवा उपोषण करण्यात येईल, असा इशाराही सचिन राऊत यांनी दिला आहे.

## एसटीच्या 'एनसीएमसी' कार्डमुळे वाहकांची डोकेदुखी वाढली!

### दुर्गम भागात नेटवर्कचा खेळखंडोबा; प्रवाशांशी वाद आणि तपासणीच्या फेऱ्यांमुळे वाहक तणावात

ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) १२ वर्षे पूर्ण ते ७५ वर्षांपर्यंतच्या महिला तसेच ६५ वर्षे पूर्ण ते ७५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलतीच्या प्रवासाकरिता 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (NCMC) अनिवार्य केले आहे. मात्र, चंद्रपूर-गडचिरोलीसारख्या दुर्गम व नक्षलग्रस्त भागात हेच कार्ड सध्या एसटी वाहक (कंडक्टर) व प्रवाशांसाठी डोकेदुखी ठरत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

या योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या कार्डवर रिचार्ज असणे आवश्यक असून, वाहक ते कार्ड मशीनमध्ये स्वाइप/टॅप करून सवलतीचे तिकीट काढतात. परंतु, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यातील जंगली तसेच ग्रामीण भागातील खेड्यापाड्यांमध्ये मोबाईल नेटवर्कचा कायम पत्ताच नसतो. नेटवर्कअभावी तिकीट मशीन तासनतास केवळ 'गोल-गोल' फिरत राहते आणि तिकीट निघत नाही. तसेच अनेकदा नेटवर्क नसल्याने प्रवाशांना वेळेवर कार्ड रिचार्ज करणेही अशक्य होते.

तिकीट मिळण्यास विलंब झाल्यास प्रवाशांचा संयम सुटतो. यातून गाडीतच वाहक



आणि प्रवाशांमध्ये खटके उडत असून अनेकदा वाहकांना शिवीगाळ व वादाला सामोरे जावे लागत आहे. दुसरीकडे, नेटवर्कमुळे तिकीट निघाले नाही आणि मार्गावर तपासणी अधिकारी (चेकिंग पथक) आले, तर विनातिकीट प्रवासी प्रवासाचा ठपका थेट वाहकावर ठेवून कारवाई केली जाते. एका बाजूला प्रवाशांचा रोष तर दुसऱ्या बाजूला प्रशासकीय कारवाईची टांगती तलवार, अशा कात्रीत सापडल्यामुळे वाहक प्रचंड मानसिक दडपणाखाली सेवा बजावत आहेत.

एसटी महामंडळात सध्या अनेक वाहक हे वयोवृद्ध असून निवृत्तीच्या उंबरठ्यावर आहेत. या वयात नव्या तांत्रिक उपकरणांशी आणि NCMC प्रणालीतील वारंवार येणाऱ्या त्रुटींशी जुळवून घेताना त्यांची मोठी दमछाक होत आहे.

तांत्रिक अडचणींमुळे उद्भवणारा हा गोंधळ पाहता महामंडळाने यावर तात्काळ व्यावहारिक तोडगा काढणे गरजेचे आहे. दुर्गम, नक्षलग्रस्त व नेटवर्क नसलेल्या ग्रामीण भागात पूर्वीप्रमाणेच रोख रक्कम स्वीकारून ५० टक्के सवलतीचे तिकीट देण्याची मुभा द्यावी, अशी जोरदार मागणी एसटी वाहक, प्रवासी आणि सर्वसामान्य नागरिकांमधून केली जात आहे.




## तुलानमाल येथे वन्यजीव सप्ताह साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी वन विभाग, वन परिक्षेत्र अंतर्गत येणाऱ्या मेंडकी उपक्षेत्र द्वारा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तुलानमाल येथे वन्य जीव सप्ताहाच्या निमित्याने गावात जन जागरण रॅली, विद्यार्थी मार्गदर्शन, वृक्षारोपण आदी कार्यक्रम घेण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रल्हाद हानवाटे, दादाजी कुट्टरमारे, अमोल ठाकरे अध्यक्ष शाळा समिती, सदस्य पंकज चहांडे, वी. न.कीलनाके क्षेत्र सहाय्यक, आर. यू.भरणे वनरक्षक, मसारकर वन रक्षक, वी.आर.चौधरी वन रक्षक ,विजय कुंभारे, जगदीश मेहेर, टीकाराम बोकडे, निलिमा यावलकर, मुन्नी जुनघरे, भोयर सर उपस्थित होते. प्रास्ताविक कुंभारे, तर संचलन जगदीश मेहेर यांनी केले. आभार प्रदर्शन चौधरी मॅडम वनरक्षक यांनी केले. यावेळी गावातील नागरिक उपस्थित होते.

## संपादकीय...

# दिल्लीत राजकीय संघर्षाची धग!

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँक्रोच जनता पार्टीने आंदोलनाची भूमिका घेतली आहे. १० ऑक्टोबरला दिल्लीकडे कूच करण्याची घोषणा केली आहे. त्याच वेळी काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष, उबाठासेना आणि अन्य विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या बैठका सुरू आहेत. निवडणूक प्रक्रियेतील एसआयआरच्या मुद्द्यावर विरोधकांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले असून, निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत जनतेच्या मनात संशय निर्माण होत असल्याचा त्यांचा दावा आहे. सत्ताधारी पक्ष मात्र हे आरोप राजकीय हेतूने प्रेरित असल्याचे सांगत बचावाची भूमिका घेत आहे. या साऱ्या संघर्षाचे गांभीर्य यासाठी अधिक आहे की, निवडणूक आयोग हा कोणत्याही एका सरकारचा किंवा पक्षाचा विभाग नाही. निवडणुकीची प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक आहे, असा विश्वास नागरिकांना वाटणे ही लोकशाहीची मूलभूत गरज आहे. त्यामुळे आयोगाच्या निर्णयांवर टीका करण्याचा विरोधकांना अधिकार आहे; त्याचवेळी त्या टीकेला तथ्य, पुरावे आणि घटनात्मक चौकटीची जोड असणेही तितकेच आवश्यक आहे. अन्यथा संस्थांवरील अविश्वास वाढविण्याचे राजकारण सुरू होईल आणि त्याचा फटका अखेरीस संपूर्ण व्यवस्थेलाच बसू शकतो.

या पार्श्वभूमीवर दिल्लीतील आंदोलनांभोवती उभारण्यात आलेली सुरक्षा व्यवस्थाही चर्चेचा विषय ठरली आहे. जंतरमंतर, संसद परिसर, नॉर्थ ब्लॉक, साउथ ब्लॉक आणि निवडणूक आयोगाच्या कार्यालयाभोवती मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला. बॅरिकेड्स, वाहतूक निर्बंध, अतिरिक्त तपासणी आणि प्रतिबंधात्मक कारवाई यामुळे राजधानीतील वातावरण तणावपूर्ण बनले. आंदोलनकर्त्यांना रोखण्यासाठी करण्यात आलेल्या कारवाईवर विरोधकांनी आक्षेप घेतला. लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा अधिकार असताना राजधानीला छावणीचे स्वरूप देण्याची गरज काय, असा त्यांचा सवाल आहे. सुरक्षा यंत्रणांचा युक्तिवादही दुर्लक्षित करता येणार नाही. दिल्लीतील लुटियन्स परिसरात संसद, केंद्रीय मंत्रालये, सर्वोच्च न्यायालय, परदेशी दूतावास आणि अन्य राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था आहेत. त्यामुळे मोठ्या आंदोलनाच्या वेळी कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी खबरदारी घेणे आवश्यक आहे. परंतु सुरक्षेच्या नावाखाली नागरिकांच्या आंदोलनाच्या अधिकारावर अनावश्यक बंधने येत असतील, तर त्याचाही विचार करावा लागेल. सुरक्षा आणि स्वातंत्र्य यांच्यातील समतोल हाच लोकशाही राज्यव्यवस्थेचा खरा कस आहे.

दिल्लीतील सद्य:स्थितीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विरोधी पक्षांमध्ये वाढत असलेली सक्रियता, काँग्रेससह प्रादेशिक पक्षांनी एकत्र येत सरकारविरोधी आंदोलनाची दिशा निश्चित करण्यास सुरुवात केली आहे. ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसपासून समाजवादी पक्ष आणि उबाठासेनेपर्यंत विविध पक्ष आपापल्या राजकीय भूमिकांसह या संघर्षात उत्तरले आहेत. या पक्षांची विचारसरणी, प्रादेशिक हितसंबंध आणि राजकीय गणिते वेगवेगळी असली तरी निवडणूक प्रक्रियेच्या मुद्द्यावर त्यांना समान व्यासपीठ मिळत आहे. मात्र, विरोधकांची ही एकजूट किती काळ टिकते, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

सत्ताधाऱ्यांसाठीही ही परिस्थिती तितकीच आव्हानात्मक आहे. विरोधकांच्या प्रत्येक आरोपाला केवळ राजकीय कटकारस्थान म्हणून झटकून टाकणे दीर्घकाळ उपयोगी ठरणार नाही. निवडणूक आयोगाच्या कामकाजाबाबत जनतेच्या मनात शंका निर्माण होत असतील, तर त्या शंकांचे निरसन पारदर्शक पद्धतीने करणे ही सरकारची आणि संबंधित संस्थांची जबाबदारी आहे. लोकशाही संस्थांवरील विश्वास हा आदेशाने निर्माण करता येत नाही; तो कृतीतून निर्माण करावा लागतो. आजचा खरा प्रश्न कोणाचा राजकीय विजय होणार, हा नाही. प्रश्न आहे तो लोकशाही संस्थांवरील जनतेचा विश्वास अबाधित कसा राहणार, हा. निवडणूक आयोगावरील आक्षेप असोत किंवा सरकारविरोधातील आंदोलन; दोन्ही बाजूंनी घटनात्मक मर्यादांचे भान ठेवणे आवश्यक आहे. आंदोलनाचा अधिकार लोकशाहीचा प्राण आहे, तर कायदा-सुव्यवस्था ही तिची गरज आहे. या दोन्हींचा समतोल राखणे हीच सत्तेची खरी परीक्षा आहे.

# मातृभाषा मराठी ही जगण्याचा श्वास व्हावा

## डॉ. युवराज मेश्राम : अभिजात मराठी भाषा दिन

ब्रह्मपुरी/का.प्र.

'दि. ०३ ऑक्टोंबर २०२४ ला केंद्र सरकारने आपल्या माय मराठीला अभिजात भाषेचा



दर्जा बहाल केला. संविधानात २२ भाषांचा उल्लेख केला आहे त्यात मराठी आहे. मराठी फार प्राचीन भाषा असून ती समृध्द होण्यासाठी तिचे जतन करणे आवश्यक आहे. आपण बहुभाषिक व्हावे पण रोजच्या जगण्याचा श्वास मराठी भाषा व्हावी', असे विचार डॉ युवराज मेश्रामांनी व्यक्त केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात 'अभिजात मराठी भाषा दिना'निमित्त प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर तर मराठी विभागप्रमुख डॉ धनराज खानोरकर, इतिहास विभागप्रमुख डॉ मोहन कापगते, डॉ प्रकाश वट्टी उपस्थित होते. यावेळी डॉ कापगतेंनी मराठी समृद्ध होण्यासाठी आपण झटले पाहिजे. मराठीवर अनेक आक्रमणे झाली पण ही भाषा जीवंत आहे आणि राहील, असा आशावाद व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात आपला मराठी बाणा आपण दाखविला पाहिजे अन् महाराष्ट्रात कोणताही भाषिक आपणासमोर आला तर आपण आपल्याच भाषेत व्यक्त झाले पाहिजे, असा सल्ला डॉ. शेकोकर यांनी दिला.

प्रास्ताविक डॉ धनराज खानोरकर, संचालन डॉ प्रकाश वट्टी तर आभार प्रदर्शन प्रिती हिने केले. कार्यक्रम मराठी विभागाने आयोजित केला होता. कार्यक्रमाला साहित्याचे भरपूर विद्यार्थी उपस्थित होते.

# न.प.मार्फत नागरिकांना विविध प्रमाणपत्रांचे वितरण



ब्रह्मपुरी/का.प्र.

सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कामांसाठी कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागू नयेत, यासाठी महाराष्ट्र शासनाने सुरू केलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'चा ब्रम्हपुरीत मोठा धडाका पाहायला मिळाला. ०१ ऑक्टोबर २०२६ रोजी ब्रम्हपुरी तहसील कार्यालय आणि नगर परिषदेच्या संयुक्त विद्यमाने एका भव्य सेवा संकल्प शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या माध्यमातून शेकडो नागरिकांना त्यांच्या हक्काचे दाखले आणि प्रमाणपत्रे थेट जागेवरच सुपूर्द करण्यात आले. 'सेवा प्रत्येकापर्यंत, समृद्ध महाराष्ट्रासाठी' ही संकल्पना केवळ कागदावर न ठेवता ती प्रत्यक्षात आणण्यासाठी ब्रम्हपुरी प्रशासनाने कंबर कसली आहे. शासकीय सेवा अत्यंत सुलभ, पारदर्शक आणि वेळेत नागरिकांपर्यंत पोहोचवणे हा या शिबिराचा मुख्य हेतू होता. नगर परिषदेमार्फत विविध प्रलंबित प्रकरणांचा जागेवरच निपटारा करण्यात आला, ज्यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैशांची मोठी बचत झाली. प्रमाणपत्र वितरणासोबतच नागरिकांना शासनाच्या विविध लोकोपयोगी योजनांची सविस्तर माहिती देऊन त्यांचे अर्जही भरून घेण्यात आले.

उपविभागीय अधिकारी पर्वणी पाटील, तहसीलदार सतीश मासाळ, नगर परिषद ब्रम्हपुरीच्या मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे आणि कार्यालय अधीक्षक शरद नन्नावरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# मोकाट डुकराच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

ब्रह्मपुरी/का.प्र.

शुक्रवारी (दिनांक २ ऑक्टोबर) रात्री ११ वाजताच्या सुमारास निलेश साखरकर बोंडेगाव वार्ड, हे आपल्या स्कुटीने ब्रह्मपुरी-नागभीड रस्त्यावरून जात होते. साई पेट्रोल पंपाजवळ अचानक एका मोकाट डुकराने त्यांच्या वाहनाला भीषण धडक दिली. या धडकेत निलेश रस्त्यावर कोसळल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली.

अपघातानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी नागपूर येथील एका खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, तिथे उपचार सुरू असतानाच शनिवारी (दिनांक ३ ऑक्टोबर) त्यांची प्राणज्योत मालवली. मृत निलेश यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी आणि दोन लहान मुले असा परिवार आहे.

## विनोदिनी

आमच्या कामवाल्या मावशींना विचारले... 'या निवडणुकीत मत द्यायचे किती पैसे मिळाले आत्तापर्यंत ...?'

मावशी : 'पैसे आत्ता नाही मिळत भाऊ. आदल्या दिवशी दिले तर देतील पण आत्ता संक्रांत वाण मिळालं. कुकर वाटले....'

मी : 'अरे वा .. पैसे काय खर्च होतात. वस्तू कायमस्वरूपी टिकते...'

मावशी : 'कसलं टिकणं ..?? फक्त कुकर देऊन गेले. मला निवडून आणल तरच झाकणं देतील सांगून गेलेत...'

**लोकशाही जिवंत आहे ती अशा बुद्धीमान उमेदवारांमुळेच...**

# 'मेरखट' काढण्याच्या नावावर भोंदूबाबाने दिला महिलेला तब्बल ९८ हजाराचा गंडा

ब्रम्हपुरी/का.प्र.

घरात चाललेला आजारपण, अडी -अडचणी आणि अज्ञानाचा गैरफायदा घेऊन भोंदूबाबांनी लोकांना लुटल्याच्या अनेक घटना आपण ऐकतो. अशीच एक संतापजनक घटना ब्रम्हपुरी तालुक्यातील गांगलवाडी येथे उघडकीस आली आहे. एका भोंदूबाबाने एका महिलेला तब्बल ९८ हजार रुपयांना गंडा घातला आहे. याप्रकरणी पीडित महिला संध्या मनोहर मशाखेत्री (वय ३५, रा. गांगलवाडी) यांनी पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी येथे फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून आरोपी भोंदूबाबाविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ (४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी साडे अकराच्या सुमारास गांगलवाडी गावात दोन अनोळखी व्यक्ती भिक्षा मागण्यासाठी आल्या होत्या. त्यातील एका व्यक्तीने अंगात पांढरा शर्ट, काळी लुंगी, डोक्यावर लाल फेटा आणि हातात मोरपिसाचा झाडू धरला होता. पीडित महिलेने त्याला १० रुपये भिक्षा दिली. त्यानंतर त्या भोंदूबाबाने घरात कोण कोण आहे, अशी विचारपूस केली. नवरा दारू पिऊन झोपला आहे आणि मुले शाळेत गेली आहेत हे कळताच त्याने आपला जाळ फेकायला सुरुवात केली. तुमच्या घरात किडा लागला आहे, पूजा करावी लागेल, असे सांगून त्याने महिलेकडून पाणी, अगरबत्ती, तांदूळ आणि धागा मागवून घेतला. काही भोंदूगिरीचे प्रकार करून त्याने महिलेकडून पूजा आणि उपायांच्या नावाखाली पहिल्याच दिवशी रोख ८,००० रुपये लाटले.

एवढ्यावरच तो भोंदूबाबा थांबला नाही. त्याच दिवशी रात्री त्याने मोबाईलवरून संपर्क साधून महिलेला अधिक घाबरवले. 'तुमच्या नवऱ्याला 'मेरखट' लागली आहे. ती काढण्यासाठी 'अबुस बुत्ती' नावाचे महागडे औषध लागेल,' असे सांगितले. हे औषध ब्रम्हपुरी येथील वडसा रोडवरील दुकानात मिळेल असे सांगून दुकानदाराचा नंबर दिला. भोंदूबाबाच्या सांगण्यावरून महिलेने त्या दुकानात जाऊन दोन टप्प्यांत (२० आणि २७ सप्टेंबर रोजी) तब्बल ३८,११५ रुपयांची औषधे विकत घेतली. औषधे देऊनही समाधान न झालेल्या या भोंदूबाबाने १ ऑक्टोबर रोजी पुन्हा फोन केला. घराची संपूर्ण पूजा करण्यासाठी सोने आणि ५५ हजार रुपये लागतील, असे सांगितले. घाबरलेल्या महिलेने तळोधी गावातील पाण्याच्या टाकीजवळ जाऊन त्या बाबाला ३० हजार रुपये रोख आणि १२ ग्रॅम सोन्याचे दागिने (दोन अंगठ्या व बिर्या, किंमत सुमारे ६० हजार रुपये) दिले. मी दर्ग्यात जाऊन पूजा करतो आणि संध्याकाळी सोने-पैसे परत करतो. तोपर्यंत घरात खड्डा खोदून ठेव,असे सांगून तो भोंदूबाबा आपल्या मोटरसायकलवरून निघून गेला. मात्र, संध्याकाळ झाली तरी बाबा परत आलाच नाही आणि त्याचा फोनही बंद येऊ लागला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच महिलेने थेट ब्रम्हपुरी पोलीस ठाणे गाठले.

पीडित महिलेच्या तक्रारीवरून शनिवार, ०३ ऑक्टोबर २०२६ रोजी ब्रम्हपुरी पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. अंगावर पांढरा फुलशर्ट, काळी लुंगी, डोक्यावर लाल फेटा असणाऱ्या या संशयित भोंदूबाबाचा पोलीस शोध घेत आहेत.

# रणमोचन येथे विदर्भस्तरीय खुली खंजेरी भजन स्पर्धा

ब्रह्मपुरी/का.प्र.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथी महोत्सवाचे औचित्य साधून श्री गुरुदेव सेवा मंडळ, रणमोचन (नवीन वस्ती) यांच्या वतीने रविवार, ११ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्रो ८:०० वाजता भव्य विदर्भस्तरीय खुली खंजेरी भजन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम श्री गुरुदेव सेवा मंडळ, रणमोचन येथे पार पडणार असून या स्पर्धेचे भव्य उद्घाटन आमदार विजय वडेट्टीवार यांच्या शुभहस्ते होणार आहे.

स्पर्धेतील विजेत्यांसाठी पुरुष व महिला अशा दोन्ही गटांत आकर्षक रोख पारितोषिके ठेवण्यात आली आहेत. यात पुरुष गट पारितोषिके यामध्ये प्रथम १५,००१ रुपये, द्वितीय ११,००१ रुपये, तृतीय ७,००१ रुपये, चतुर्थ ५,००१ रुपये आणि पांचवे ३,००१ रुपये ठेवण्यात आलं आहे. तसेच महिला गट मध्ये प्रथम ९,००१ रुपये, द्वितीय ५००१ रुपये, तृतीय ३,००१ रुपये, चतुर्थ २,००१ रुपये, पांचवे १,००१ रुपये पारितोषिक रोख स्वरूपात असणार आहेत. स्पर्धेत जास्तीत जास्त भजन मंडळांनी सहभागी होण्याचे आवाहन मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# खिस्तानंद विद्यालयात शालेय मंत्रीमंडळाचे गठन

ब्रम्हपुरी/का.प्र.

स्थानिक खिस्तानंद स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे नुकतेच शालेय मंत्रिमंडळाचे गठन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यालयाचे व्यवस्थापक फादर शिबू एमडी तर प्रमुख अतिथी म्हणून तालुका क्रीडा संघटनेचे अध्यक्ष गोपाल भानारकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक फादर बिनू थॉमस, उपमुख्याध्यापिका सिस्टर अंजली प्रामुख्याने उपस्थित होत्या.



विद्यालयात शैक्षणिक सत्रात विविध सांस्कृतिक, शैक्षणिक तथा क्रीडा कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजना करता विद्यार्थ्यांच्या विविध समित्यांचे गठन केले गेले.

यामध्ये शाळा प्रमुख म्हणून कु. वेदिका रामटेके, शाळा सचिव मोहम्मद सिद्दीक नजीम हुसेन शेख, क्रीडा प्रमुख कु. माही अवसारे तर ब्लु ग्रुप प्रमुख कौशिक बोरकर व सुखदा मोरे, येलो ग्रुप प्रमुख सुमेध गजपुरे व वैष्णवी मुलनकर, रेड ग्रुप प्रमुख स्पर्श सहारे व आभा पिलारे, ग्रीन ग्रुप प्रमुख जय राऊत ऐश्वर्या हजारे, भाषा प्रमुख भाऊराव मोटघारे व मुग्धा गणवीर, इतिहास आणि भूगोल क्लब वरद गाडे व कु. मलक फातिमा फहीम जिवानी, गणित क्लब पार्थ प्रधान व शौर्या बांगरे विज्ञान आणि इको क्लब सचित गजभिये, कु. प्रांशा शंभरकर, सायबर क्लब अर्णव ठाकरे कु. योशा निमगडे यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहा. शिक्षक सुरज मेश्राम क्रीडा शिक्षक गोविंद करंबे, कलाशिक्षक लेकराम डेंगे, विकास राऊत, सुरज मुळे व क्रीडा समितीच्या सर्व सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# वीज पडून जखमी झालेल्यांना आर्थिक मदत द्या

## तनय देशकर यांचे तहसिलदारांना निवेदन

ब्रह्मपुरी/का.प्र.

तालुक्यातील बरडकिन्ही व आक्सापूर येथे वीज पडून जखमी झालेल्या ९ शेतकरी व मजुरांना शासनाच्या नियमानुसार तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी भाजपा युवा मोर्चाचे चंद्रपूर जिल्हाध्यक्ष तनय देशकर यांनी तहसीलदार ब्रह्मपुरी यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निवेदनाद्वारे केली आहे.

या घटनेमुळे जखमींच्या कुटुंबांवर उपचाराचा खर्च आणि आर्थिक संकटाचा अतिरिक्त भार पडला आहे. त्यामुळे प्रशासनाने घटनेची नोंद घेऊन आवश्यक पंचनामा व कागदपत्रांची पूर्तता करून सर्व पात्र जखमींना शासनाच्या नियमाप्रमाणे आर्थिक मदत तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी तनय देशकर यांनी केली आहे.

# राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत ब्रम्हपुरीकरांनी पटकाविले ८ पदके

ब्रह्मपुरी/का.प्र.

२७ वी महाराष्ट्र स्टेट मास्टर्स ॲक्वाटिक चॅम्पियनशिप २०२६ चे आयोजन दिनांक ३ व ४ सप्टेंबर २०२६ ला एकलव्य क्रीडा संकुल स्विमिंग पूल जळगाव येथे आयोजित करण्यात आली. या राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातून विविध जिल्ह्यातील एकूण २११ जलतरणपटू सहभागी झाले होते.



ब्रम्हपुरीतील स्पार्टाकस शेंडे, पराग राऊत, शिवराज मालवी व घनश्याम नागपुरे यांनी चंद्रपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करीत सहभाग घेतला व राज्यस्तरीय स्पर्धेत ८ पदकांची कमाई करत स्पर्धेमध्ये ब्रह्मपुरी चे नाव रोशन केले. ४०-४४ या वयोगटात स्पार्टाकस शेंडे यांनी ५० मीटर बॅक स्ट्रोक मध्ये सिल्वर मेडल व ५० मीटर बटरफ्लाय स्ट्रोक मध्ये ब्राँझ मेडल पटकावलं. ४०-४४ वयोगटात घनश्याम नागपुरे यांनी १०० मीटर बॅक स्ट्रोक मध्ये सिल्वर मेडल व ५० मीटर बॅक स्ट्रोक मध्ये ब्राँझ मेडल पटकावलं. तसेच पराग राऊत यांनी ३०-३४ या वयोगटात १०० मीटर बॅक स्ट्रोक मध्ये गोल्ड मेडल, ५० मीटर बटरफ्लाय स्ट्रोक मध्ये सिल्वर मेडल, ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक मध्ये सिल्वर मेडल व ५० मीटर फ्री स्टाईल मध्ये ब्राँझ मेडल पटकावलं. विजयी जलतरणपटूंचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# बरडकिन्ही शेतशिवारात दोन वाघांच्या तुंबड युध्दात एका वाघाचा मृत्यू

ब्रह्मपुरी/का.प्र.

उत्तर ब्रह्मपुरी वनपरिक्षेत्राअंतर्गत येणाऱ्या बरडकिन्ही शेतशिवारात दोन वाघांमध्ये वर्चस्वाची लढाई झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या भीषण संघर्षात एका अंदाजे दीड ते दोन वर्षे वयाच्या नर वाघाचा दुर्दैवी मृत्यू झाला. धक्कादायक बाब म्हणजे, दुसऱ्या वाघाने या वाघाचा जंगलातून शेतापर्यंत पाठलाग करून त्याला ठार केले आणि त्यानंतर त्याचा काही भाग खाल्ल्याचेही घटनास्थळावरील दृश्यावरून निष्पन्न झाले आहे.

बरडकिन्ही येथील शेतकरी पटवारी रामाजी गेडाम हे ३ ऑक्टोबर रोजी आपल्या गट क्रमांक २६२ मधील शेतात गेले असता, त्यांना एका वाघाचा मृतदेह आढळून आला. त्यांनी या घटनेची माहिती तात्काळ ब्रह्मपुरी वन विभागाला दिली. माहिती



मिळताच उपवनसंरक्षक डॉ. कुमारस्वामी यांच्या मार्गदर्शनात सहाय्यक वन संरक्षक डॉ. महेश गायकवाड आणि वनपरिक्षेत्र अधिकारी अरुप कन्नमवार यांच्या नेतृत्वात पथकाने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी मानद वन्यजीव रक्षक अमोद गौरकर, वनरक्षक राजेंद्र भरणे, दिलीप लाडे, सचिन शेंडे, मासाळकर आणि क्षेत्र सहाय्यक राकेश चौधरी यांच्या उपस्थितीत घटनास्थळाचा रीतसर मोक्का पंचनामा करण्यात आला.

पंचनाम्यानंतर मृत वाघाचा मृतदेह शवविच्छेदनासाठी ब्रह्मपुरी वन विभागात आणण्यात आला. ब्रह्मपुरीचे सहायक आयुक्त संजय बावणे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अतुल उरकुडे आणि शंकरपूरचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. मनोज पाटील यांच्या पथकाने वाघाचे शवविच्छेदन केले. मृत्यूचे अचूक कारण आणि अधिक तपासासाठी वाघाचा विसरा फॉरेन्सिक लॅबकडे पाठवण्यात आला आहे.

# महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री हे प्रेरणास्त्रोत

## - प्राचार्य डॉ. शेकोकर



ब्रह्मपुरी/का.प्र.

"देशाला शांततेच्या मार्गाने अहिंसेच्या वाटेने नेवून एका अदाकारीने महात्मा गांधींनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. 'जय जवान जय किसान' म्हणत लालबहादूर शास्त्रींने शेतकऱ्यांचे हित जोपासले. त्यांचे कार्य देश विसरु शकत नाही, दोघे आपल्यासाठी प्रेरणास्त्रोत होत", असे विचार प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी मांडले. महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्रींच्या जयंतीनिमित्त ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ शेकोकर,अधीक्षक संगीता ठाकरे, पर्यवेक्षक प्रा आनंद भोयर यांनी प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन केले.

जयंती दिनानिमित्त परिसरात स्वच्छता अभियान व पथनाट्य सादर करण्यात आले. यावेळी डॉ राजेंद्र डांगे, डॉ धनराज खानोरकर, डॉ असलम शेख, डॉ रतन मेश्राम, डॉ मोहन कापगते, डॉ युवराज मेश्राम, डॉ सुनिल चौधरी, डॉ मिलिंद पठाडे, डॉ भास्कर लेनगुरे, डॉ वर्षा चंदनशिवे, डॉ प्रकाश वट्टी, डॉ पद्माकर वानखडे, डॉ योगेश ठावरी, डॉ किशोर नाकतोडे, डॉ अरविंद मुंगोले, डॉ राजू आदे, प्रा रुपेश वाकोडीकर, प्रा जयेश हजारे, डॉ अतुल येरपुडे, डॉ कुलजित शर्मा, प्रा अजय खोब्रागडे, डॉ मोहुर्ले, डॉ दुपारे, प्रा मेंघरे, रोशन डांगे, अलोक मेश्राम, प्रज्ञा मेश्राम इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन डॉ युवराज मेश्रामांनी केले तर यशस्वीसाठी डॉ खानोरकर, प्रा धिरज आतला, गोलू कोसे, विलास खोब्रागडेंनी सहकार्य केले.

# चौगान येथे गोपाळ समाजबांधवांना जात प्रमाणपत्राचे वाटप



ब्रह्मपुरी/का.प्र.

वर्षानुवर्षांपासून उपेक्षित आणि शासकीय ओळखीपासून वंचित असलेल्या गोपाळ भटक्या समाजातील कुटुंबांसाठी हा दिवस ऐतिहासिक ठरला. चौगान येथील सामाजिक कार्यकर्ते कृपाकर चहांदे यांच्या कार्यालयात पार पडलेल्या विशेष सोहळ्यात गवर्ला व चिचगाव डोर्ली येथील गोपाळ समाजातील बांधवांना अधिकृत 'जातीचे प्रमाणपत्र' (Caste Certificate) वाटप करण्यात आले.

उपविभागीय अधिकारी (SDM) पर्वनी पाटील मॅडम व तहसील कार्यालयाचे विशेष सहकार्य आणि कृपाकर चहांदे सामाजिक कार्यकर्ते यांच्या सातत्यपूर्ण पाठपुरावामुळे हा हक्क साध्य झाला आहे.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून लाभलेले ॲड. गणेशजी राऊत आणि माजी सरपंच उमेशजी धोटे यांच्या शुभहस्ते लाभार्थ्यांना दाखल्यांचे वितरण करण्यात आले. या सोहळ्याला गवर्ला आणि चिचगाव डोर्ली येथील गोपाळ भटक्या समाजातील महिला, पुरुष व बालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आनंद व्यक्त केला.

हा कार्यक्रम पार पाडण्यासाठी शीला चहांदे आणि संकल्प चहांदे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. हा केवळ कागदाचा तुकडा नसून आमच्या गोपाळ समाजाच्या स्वाभिमानाची आणि कायदेशीर अस्तित्वाची ओळख आहे. या दाखल्यांमुळे आता मुलांचे शिक्षण, रेशन व घरकुल योजनांचा मार्ग मोकळा झाला आहे.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# जिल्ह्यातील मासेमार संस्थांना दुष्काळी मदत द्या

## यशवंत दिघोरे यांची मागणी

ब्रह्मपुरी/का.प्र.

चंद्रपूर जिल्ह्यात मासेमारांच्या १६५ मत्स्यव्यवसाय सहकारी संस्था कार्यरत असून या संस्थांचे अंदाजे २७००० सभासद व इतर मासेमार कुटुंबाचे आर्थीक व्यवहाराचे साधन जिल्ह्यातील ९४ पाटबंधारे तलाव व ११०० चे वर जिल्हा परिषदचे मामा तलाव तसेच जिल्ह्यातून वाहणाऱ्या नदी नाल्यातील मासेमारी करुन कुटुंबाचे उदरनिर्वाह करणे यावर अवलंबून आहे. मागील मामा तलावाची कामे करण्याकरीता बऱ्याचशा जिल्हा परिषद तलावातील पाणी सोडून कामे करण्यात आली. त्यामुळे तलावात पाणीसाठा अत्यल्प होता.

मासेमार सहकारी संस्थानी जून, जुलै महिन्यात आपल्याकडे ठेक्याने असलेल्या तलावात मत्स्यबीजाचे संचयण केले आहे. अपुऱ्या पावसाने उद्भवणाऱ्या परिस्थीतीने मत्स्यबाजीची वाढ होणार नाही व त्यामुळे मत्स्य संस्थांनी मत्स्यबीज खरेदी व इतर झालेला खर्च सुध्दा मासेमारीतून निघणार नाही. अशा परिस्थितीत संस्थांच्या सभासदांना मासेमारीतून रोजगार देवू शकणार नाही व त्यामुळे सभासद तसेच संस्थाना आर्थीक संकटाचा सामना करावा लागणार आहे व मासेमारांवर उपासमारीची वेळ आलेली आहे.

शासनाने चंद्रपूर जिल्ह्यात दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना आर्थीक मदत देण्याचे शासनाकडून ठरविण्यात आले आहे. मत्स्यव्यवसाय हा पुर्णतः पाण्यावर अवलंबून असलेला व्यवसाय आहे. तलावात अत्यल्प पाणी असल्याने मत्स्यव्यवसाय डबघाईस आलेला आहे. अशा दुष्काळी परिस्थितीत जिल्ह्यात मत्स्य दुष्काळ जाहीर करुन मासेमार सहकारी संस्था मासेमार यांना शासनाकडून आर्थीक मदत करण्यात यावी अशी मागणी यादव मेश्राम अध्यक्ष, जिल्हा मत्स्यव्यवसाय सहकारी संघ, चंद्रपूर व यशवंत दिघोरे, संचालक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चंद्रपूर व मत्स्य संस्थांचे संचालक मंडळ यांनी केली आहे.



**महात्मा गांधी जयंतीनिमित्त नगर परिषद ब्रम्हपुरीच्या वतीने 'सेवा संकल्प' व 'स्वच्छता ही सेवा-२०२६' अभियानांतर्गत 'एक दिवस, एक साथ, एक तास' या संकल्पनेतून स्वच्छता अभियान राबविण्यात आले. मुख्याधिकारी डॉ. माधुरी सलामे व पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता मोहित जी. ढोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित उपक्रमात अधिकारी, कर्मचारी, स्वच्छता मित्र व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन श्रमदान केले.**

# गोंदियात 'राईस अँण्ड ग्रेन मिलिंग एक्सपो'चे आयोजन

## देशातील सर्वात मोठ्या एक्सपोत १२० मशिनरी कंपन्या सहभागी होणार

ब्रम्हपुरी/का.प्र.

तांदूळ आणि डाळ प्रक्रिया उद्योगात वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाचा आणि यंत्रसामग्रीचा भव्य सोहळा गोंदियात रंगणार आहे. 'फेडरेशन ऑफ विदर्भ राईस इंडस्ट्रीज असोसिएशन' आणि 'राईस मिलर्स असोसिएशन गोंदिया' यांच्या संयुक्त विद्यमाने तथा 'अडामस इव्हेंट्स प्रायव्हेट लिमिटेड'च्या वतीने भारतात आतापर्यंतच्या सर्वात मोठ्या 'राईस अँड ग्रेन मिलिंग एक्स्पो' (Rice & Grain Milling Expo) चे आयोजन करण्यात आले आहे. हे भव्य प्रदर्शन २३, २४ आणि २५ ऑक्टोबर २०२६ रोजी स्वागत लॉन पार्किंग ग्राउंड, घाट रोड, गोंदिया (महाराष्ट्र)येथे पार पडणार आहे.

या प्रदर्शनात भारतातील तसेच जगभरातील १२० हून अधिक नामांकित स्वदेशी आणि परदेशी कंपन्या सहभागी होत आहेत. तांदूळ आणि डाळ उद्योगात जगभरात वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे आणि मशिनरीचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक (Live Demo) या ठिकाणी पाहायला मिळेल. राईस मिलर्स, ट्रेडर्स आणि ब्रोकर बंधूंना आपल्या व्यवसायामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करून प्रगती साधण्यासाठी हे प्रदर्शन अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

हे भव्य प्रदर्शन २३, २४ आणि २५ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०:०० ते सायंकाळी ६:०० वाजेपर्यंत स्वागत लॉन पार्किंग ग्राउंड, घाट रोड, गोंदिया, महाराष्ट्र येथे आयोजित केले असून प्रवेश पूर्णपणे मोफत राहणार आहे. आयोजकांच्या वतीने विदर्भ आणि देशातील सर्व मिलर्स, ट्रेडर्स व ब्रोकर यांना या प्रदर्शनाला आवर्जून भेट देण्याचे आणि आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती घेण्याचे निमंत्रण देण्यात आले आहे.

# एल.एम.बी. पब्लिक स्कुलमध्ये महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री जयंती







ब्रम्हपुरी/का.प्र.

दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुध्दा सत्य, अहिंसा व शांततेचा संपूर्ण जगाला संदेश देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा जन्म ०२ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. व जय जवान जय किसान असा नारा देणारे देशाचे द्वितीय पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांचा जन्म ०२ ऑक्टोबर १९०४ रोजी उत्तर प्रदेशातील मुघलसराय येथे झाला. या दोन्ही देशभक्तांच्या जयंतीचा कार्यक्रम येथील एल.एम.बी. पब्लिक स्कुल ब्रम्हपुरी येथे उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमप्रसंगी स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम उपस्थित होत्या. प्रसंगी महात्मा गांधी व लाल बहादुर शास्त्री यांच्या प्रतिमांना माल्यार्पण करण्यात आले. यावेळी स्कुलचे शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अड्याळ टेकडीवरील भक्तनिवास बांधकामाचा वाद विकोपाला

## गुरूदेव भक्तांचा तीव्र जन आंदोलनाचा इशारा

ब्रह्मपुरी/का.प्र.

अड्याळ टेकडीवरील जमिनीच्या मालकी हक्काचा वाद आणि आणि तेथे सुरू असलेल्या भक्त निवासाच्या बांधकामावरून गुरुदेव सेवा मंडळाच्या भक्तामध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. प्रशासनाने या प्रकरणात तातडीने हस्तक्षेप करून योग्य निर्णय न घेतल्यास राज्यभर तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा ब्रम्हपुरी तालुक्यातील गुरुदेव सेवा मंडळाच्या प्रतिनिधीनी दिला आहे.

यप्रकरणी गुरुदेव सेवा मंडळाच्या वतीने ब्रम्हपुरी च्या विभागीय अधिकारी पर्वनी पाटील मॅडम यांना निवेदन देण्यात आले. अड्याळ टेकडीवरील जमिनीच्या मालकीचा वाद न्याय प्रविष्ट असतानाही शासनाच्या निधीतून भक्तनिवासाचे बांधकाम सुरू करण्यात आल्याचा दावा निवेदनातून करण्यात आला आहे .तसेच तहसीलदारांनी दिलेला मालकी हक्क संदर्भातील अहवाल वस्तूस्थिती विरोधी असल्याचा गंभीर आरोप गुरुदेव भक्तांनी केला आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या भू - वैकुंठ समितीचा या जमिनीवर अनेक वर्षापासून ताबा वहिवाट आहे. कनिष्ठ व जिल्हा न्यायालयाने दावे फेटाळल्यानंतर उच्च न्यायालयानेही समितीचा ताबा मान्य केला असल्याचा दावा प्रतिनिधींनी केला आहे. असे असतानाही तहसीलदारांनी ही जमीन अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ, मोझरी यांच्या मालकीची असल्याचा अहवाल दिल्याने भाविकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर भक्त निवासाच्या बांधकामाची मंजुरी रद्द करावी तहसीलदाराचा अहवाल मागे घ्यावा आणि संबंधित अधिकाऱ्याची चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देताना डॉ.नवलाजी मुळे, घनश्याम मातेरे, संदीप कटकुरवार, तलमले महाराज, बाबुराव ठवरे, दिनकर सहारे, सुभाष बोरकर, मनोरमा मैद, डॉ.रामेश्नर राखडे हे गुरुदेव सेवक उपस्थित होते.

**जल है तो कल है...**

# ट्विंकल स्कुलमध्ये विज्ञान प्रदर्शनीचे उद्घाटन

नागभीड/प्रतिनिधी

समिधा सेवा संस्था संचालित श्रीमती रामप्यारीदेवी आसारामजी काबरा ट्विंकल इंग्लिश स्कूल, नागभीड येथे रामन सायन्स सेंटर अँड प्लॅनेटेरियम, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'Science in Curriculum' या विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन उत्साहात संपन्न झाले.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून कर्मवीर स्कूल, नागभीडच्या प्रतिभा कायरकर उपस्थित होत्या. तसेच संस्थाध्यक्ष गणेश तर्वेकर, संस्थेचे सचिव अजय काबरा, प्राचार्या शुभांगी पोहेकर, मुख्याध्यापिका संगीता नारनवरे, पालक-शिक्षक संघाचे सदस्य रवींद्र पारधी व गोकुळ पानसे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चित्रा चिलबुले व खुशाली कुर्झेकर यांनी केले तर आराध्या माटेतवार हिने आभार प्रदर्शन केले.

# पक्ष कार्यालय उद्घाटनाने ब्रम्हपुरीत उध्दवसेनेचे शक्तीप्रदर्शन

ब्रह्मपुरी/का.प्र.

आगामी राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर ब्रह्मपुरी विधानसभा मतदारसंघात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने संघटनबांधणीला वेग देत जोरदार शक्तिप्रदर्शन केले. ब्रह्मपुरी येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन आणि विधानसभा क्षेत्रातील कार्यकर्ता मेळावा उत्साहात पार पडला. गडचिरोली-चिमूर लोकसभा संपर्कप्रमुख महेश केदारी यांच्या हस्ते पक्ष कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला पदाधिकारी आणि शिवसैनिकांची मोठी उपस्थिती होती.

पक्ष कार्यालयाच्या उद्घाटनानिमित्त आयोजित कार्यकर्ता मेळाव्यामुळे ब्रह्मपुरीच्या राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. विधानसभा क्षेत्रातील विविध भागांतून आलेल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाला उपस्थिती लावल्याने पक्षाच्या संघटनात्मक हालचालींना नव्या उमेदीची किनार मिळाल्याचे चित्र दिसून आले. यावेळी जिल्हाप्रमुख भास्करराव ताजणे, उपजिल्हाप्रमुख अमित आखाडे, विधानसभा संपर्कप्रमुख दिलीप कदम, तालुकाप्रमुख नरेंद्र गाडगीलवार, शहरप्रमुख भूषण रामटेके यांच्यासह विभागातील विविध तालुकाप्रमुख, शहरप्रमुख, महिला आघाडी, युवासेना पदाधिकारी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आगामी काळात विधानसभा क्षेत्रातील संघटन अधिक मजबूत करण्याचे ठरविण्यात आले. दरम्यान, कार्यक्रमाला पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती ही आगामी राजकीय हालचालींच्या दृष्टीने लक्षवेधी ठरली आहे.

**... QUOTES ...**

"The problem with getting quotes offa da Internets, is ya don't always know if they are entirely genuine."

- Abramham Lincoln

**चारोळी**

खाल्ल्या मिठाला नाही जागले
हरामखोर नमकहराम...
आधी मीठात होते भेसळ,
मग निष्ठा होते नमक हराम...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एलएमबी पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांचे तालुकास्तरीय खो-खो क्रिडा स्पर्धेमध्ये यश





ब्रम्हपुरी/का.प्र.

जिल्हा क्रिडा परिषद चंद्रपुर व्दारे आयोजित तालुकास्तरीय शालेय मैदानी क्रिडा स्पर्धामध्ये १४ वर्षाखालील मुली व १४ वर्षाखालील मुले मैदानी स्पर्धेत एल.एम.बी. पब्लिक स्कुलच्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादित केले व त्यांची जिल्हास्तरीय खो-खो मैदानी क्रिडा स्पर्धाकरिता निवड झाली.

तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत १४ वर्षाखालील स्कुलच्या विजयी संघातील मुलींमध्ये ऋतुजा मेश्राम, रितुल दडमल, स्वरा रणदिवे, देवश्री गहाने, पूर्वी अलबनकर, समन्वी डहारे, वर्तीका मोदी, सिमरन मडावी, शर्वरी बानबले, सौम्य बेले, स्वरा पारधी तसेच १४ वर्षाखालील मुलांच्या संघातील अक्ष वानखेडे, अर्णव चौधरी, निर्मित भोयर, मयुर नन्नावरे, सशांग गुरनुले, उत्कर्ष मेंढे, सौम्य फटिंग, काव्य निमगडे, कुंदन शेंडे, युवराज चेरकुरवार, मंथन आंबोरकर, सोहम धोटे या विद्यार्थ्यांनी खो-खो स्पर्धेत भरगोस यश संपादन केले.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल एल. एम. बी. पब्लिक स्कुलचे अध्यक्ष तथा नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोकजी भैया सर, संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम, पर्यवेक्षिका रश्मी झोडे तसेच शिक्षक व कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांचा गौरव करून शुभेच्छा दिल्या. क्रिडा शिक्षिका निकिता गुरू मॅडम यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

# चौगान येथे साकारतंय प्रशस्त, भव्य वाचनालय

ब्रम्हपुरी/का.प्र.




तालुक्यातील चौगान हे गाव तालुक्यात आपली वेगळी ओळख जपली जाते. पंचक्रोशीतील सर्वाधिक शिक्षित व सैनिकांचे गाव म्हणून प्रसिद्ध आहे. गावाच्या विकासात आणखी एक महत्त्वाचा टप्पा जोडला गेला असून, चौगान येथे ४५ लाखांच्या निधीतून सुसज्ज सार्वजनिक वाचनालयाची निर्मिती करण्यात आली आहे. या वाचनालयाचे उद्घाटन लवकरच करण्यात येणार आहे.

माजी मंत्री तथा ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय वडेट्टीवार यांच्या विशेष प्रयत्नातून हे वाचनालय साकारले आहे. गावातील विद्यार्थी, स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे युवक तसेच वाचनप्रेमी नागरिकांना अभ्यासासाठी प्रशस्त व सुविधायुक्त जागा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने वाचनालयाची उभारणी करण्यात आली आहे. या ठिकाणी एकावेळी सुमारे ७० विद्यार्थी अभ्यास करू शकणार आहेत. वाचनालयात मुला-मुलींसाठी स्वतंत्र वॉशरूम, मोबाईल चार्जिंग पॉईंट, आरामदायी खुर्च्या, बॅग ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था तसेच स्पर्धा परीक्षा आणि करिअर मार्गदर्शनासाठी आवश्यक विविध पुस्तके उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

चौगान हे तालुक्यातील मोठी लोकवस्ती असलेले आणि विविध उपक्रमांमध्ये पुढाकार घेणारे गाव म्हणून ओळखले जाते. 'चौगानने केले आणि नंतर तालुक्याने स्वीकारले' अशी गावाची वेगळी ओळख असल्याचे ग्रामस्थ सांगतात. नव्या वाचनालयामुळे शालेय विद्यार्थ्यांसह स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या युवकांना मोठी सुविधा मिळणार आहे.

ब्रम्हपुरी समाचार अंक नियमित वाचनाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या वेबसाईटवर लॉगीन करा...

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध



- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

# भाकपच्या नेतृत्वातील शेतकऱ्यांच्या आंदोलनाला यश

## गोसेखुर्द धरण उजवा कालव्याचे पाणी पूर्ण क्षमतेने सुरू

ब्रम्हपुरी/का.प्र.

गोसीखुर्द उजव्या कालव्याचे पाणी उंचावरील शेतीला तात्काळ उपलब्ध करून देणे, सदोष सर्वेक्षणाची चौकशी करणे व बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी ५ लाख वाढीव सानुग्रह अनुदान त्वरित द्या! तसेच उन्हाळी हंगामात पाणी सोडण्याचे नियोजन करण्यात यावे या मागणीसाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते विनोद झोडगे पाटील यांच्या नेतृत्वात परिसरातील शेकडो बाधित शेतकऱ्यांच्या वतीने दिनांक ५ ऑक्टोबर रोजी कार्यकारी अभियंता शेख यांना निवेदन देऊन चर्चा करण्यात आली होती आणि जर ७ दिवसात पाणी सोडले नाही तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला होता. आंदोलनाची दखल घेत कार्यकारी अभियंता शेख यांनी दिनांक ६ ऑक्टोबर रोजी कार्यालयात सर्व अधिकारी, सहाय्यक अभियंते यांच्या सोबत भाकपचे नेते कॉम्रेड विनोद झोडगे यांच्या सोबत बैठक घेऊन सकाळ पासून पूर्ण क्षमतेने पाणी सुरू केले. ज्या ठिकाणी पाणी जाण्यास अडथळे निर्माण झाले आहेत त्या ठिकाणी प्रत्यक्ष स्पॉटवर जाऊन पाहणी करावी आणि सर्वांना पाणी देण्यासाठी पर्याही व्यवस्था करण्यात याव्या अश्या सूचना कार्यकारी अभियंता शेख यांनी दिल्या आहेत.

# अवैध धंदे व नशाखोरीविरोधात भाजप आक्रमक

ब्रह्मपुरी/का.प्र.

'शैक्षणिक व क्रीडा नगरी' म्हणून नावलौकिक असलेल्या ब्रह्मपुरी शहरात मागील काही काळापासून ऑनलाईन जुगार, सट्टा तसेच चरस, गांजा व ड्रग्जसारख्या अंमली पदार्थांची विक्री आणि सेवन यांसारख्या अवैध धंद्यांमध्ये मोठी वाढ झाली आहे.

या वाढत्या अवैध व्यवसायांमुळे युवा पिढी व विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येत असून, शहराच्या शांततेला आणि प्रतिष्ठेला गालबोट लागत आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीचे ब्रह्मपुरी शहर अध्यक्ष प्रा.डॉ. सुयोगकुमार बाळबुधे यांनी उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देऊन अवैध धंद्यांवर तात्काळ आळा घालण्याची आणि दोषींवर कडक कारवाई करण्याची ठाम मागणी केली आहे.

प्रा. डॉ. सुयोग बाळबुधे यांनी पोलीस प्रशासनाला तातडीने विशेष मोहीम राबवून अशा बेकायदेशीर व्यवसायांमध्ये प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे गुंतलेल्या व्यक्ती शोधून त्यांच्यावर ठोस कायदेशीर कारवाई करण्याची विनंती केली आहे. या निवेदनाच्या प्रतिलिपी मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांना पाठवण्यात आल्या आहे.



Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404